छबिलदासची दुनिया...

संध्याकाळी दादर स्टेशनजवळच्या गल्लीतल्या फुटपाथवर बसलेल्या विक्रेत्यांच्या छोटया पथा-यांमधून वाट काढत पुढे सरकल्यावर, एक मोठा जुनाट दरवाजा दिसायचा; त्यातून आत गेल्यावर समोरच्या अंधा-या, झिजल्यामुळे कुरकुरणा-या जिन्यांवरून दुस-या मजल्यावर पोचल्यानंतर एका प्रचंड मोठया हॉलमध्ये प्रवेश व्हायचा – हेच ते 'छबिलदास नाटयगृह'! पैकी एक चतुर्थांश जागेत रंगमंच आणि तीन चतुर्थांश प्रेक्षागृह! रंगमंचाच्या मागच्या एक छोटया खोलीत, दाटीवाटीने पडलेल्या नाटकाच्या प्रॉपटीच्या गदारोळामधली एक बाजू रंगभूषा आणि वेशभूषा वगैरेसाठी राखीव होती. भिंतीला लागून दोनतीन भलेमोठे आरसे मांडले होते; आरशांच्या बाजूला तात्पुरते मोठे, प्रखर पिवळे दिवे लावले होते. नावापुरता मेकअप पटापट उरकला की नटमंडळी तिथेच (प्रसंगी एकमेकांकडे पाठ करून) घाईघाईने कपडे बदलायची आणि एन्ट्रीसाठी धाव घ्यायची. प्रेक्षागृह म्हणून असलेल्या जागेत, रंगमंचाच्या विरूध्द दिशेला अगदी मागे दीडफूटी प्लॅटफॉर्मवर काही मोजक्या खुर्च्या मांडलेल्या असायच्या; त्यापुढच्या जागेत नऊ इंची प्लॅटफॉर्मवर आणि त्याखालच्या जमिनीवर भल्यामोठया सतरंज्या अंथरलेल्या असायच्या ज्यावर शंभर-दीडशे प्रेक्षक दाटीवाटीने बसायचे; वर पंखे भणभणत असूनसुध्दा उकाडयाने घामाघूम झाले तरी!

ह्या दोन्ही जागांव्यतिरिक्त एक जागा होती ती म्हणजे हॉलशेजारची लांबलचक बाल्कनी! सात वाजता प्रयोग सुरू झाला की प्रेक्षागृहात आणि त्या बाल्कनीत पसरलेल्या अंधाराचा फायदा घेऊन, कधीकधी नटमंडळींपैकी एखादा हळूच बाल्कनीत उभा राहून प्रेक्षकांच्या प्रतिक्रियांचा अंदाज घ्यायचा प्रयत्न करत असे. एकदा मी असा प्रयत्न करत असताना मला प्रकर्षाने जाणवला तो खाली चालू असलेला गदारोळ - शेजारच्या चाळीतल्या कोचिंग क्लासमधून बाहेर पडणा-या विद्यार्थी जथ्याचा कलकलाट, जवळच्या भाजीपाव गाडयांवरच्या तव्यांचा खणखणाट, भजी-वडापावचे दरवळणारे खमंग वास, नुकत्याच सुरू झालेल्या 'दूरदर्शन'च्या बातम्याआधीचं घराघरातून ऐकू येणारं तारस्वरातलं पार्श्वसंगीत आणि बातम्यांच्या धीरगंभीर आवाजाला चिरून टाकत दूरवर जाणारी भिका-याची हाक... या सगळया हलकल्लोळामध्ये आत चाललेल्या नाटकाचं काय होणार, या विचाराने मी पुरता हादरून गेलो. माझ्यापासून हाताच्या अंतरावर बसलेला प्रेक्षकसमूह, समोर चाललेल्या प्रायोगिक नाटकात इतका मग्न झाला होता का? त्याला त्या कल्ल्याचा यत्किंचितही त्रास होत नव्हता का? कालांतराने असंही वाटलं की दुस-या कोणाचं तरी नाटक प्रेक्षक म्हणून बघताना माझंही चित्त कधीच कसं विचलित झालं नाही

किंवा गुंतागुंतीचा नाटयानुभव उलगडून दाखवताना अभिनेता म्हणून मलाही कधीच त्या आवाजांपैकी कोणताच आवाज कसा ऐकू आला नाही?

ही होती त्या वास्तूची आणि तिथे घडणा-या नाटकांच्या जादुई दुनियेची किमया!

त्या दुनियेत लुप्त आणि तृप्त झालेले माझ्यासारखे कैकजण ‘छबिलदास’च्या नशेत बेभान झाले... इतके की त्या वास्तूची वहिवाट थांबली तरी आम्हाला भान आलंच नाही.

**अमोल पालेकर**